# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित विद्यापीठ)

**(सामान्य प्रशासन विभाग)**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


## अधिसूचना

क्रमांक: रातुमनावि/साप्र/१८/स/२६७७ — दिनांक : २३ मे २०१८

सर्व संबंधीतांच्या माहितीकरिता सूचित करण्यात येते की, **ज्याअर्थी** नागपूर येथील सेंट्रल इंडिया इंस्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन येथील प्रशासकीय व वित्तीय गैरप्रकाराबाबत विद्यार्थ्यांनी केलेल्या तक्रारीची चौकशी करण्यास्तव व्यवस्थापन परिषदेने दि. १८ डिसेंबर २०१७ रोजी संपन्न झालेल्या सभेत घेतलेल्या निर्णयानुसार श्री. बी.सी. चंद्रीकापूरे (माजी न्यायाधिश औद्योगीक न्यायालय, नागपूर) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीने दि. ९ मार्च २०१८ रोजी सदर महाविद्यालयात चौकशीसाठी भेट दिली असता सदर संस्थेचे अध्यक्ष श्री. सुनिलकुमार गयाप्रसाद मिश्रा यांनी चौकशी समितीच्या सदस्यांशी गैरवर्तणुक केली तसेच प्रशासकीय कामात अडथळा निर्माण केला. चौकशी समितीच्या सचिवांना व सदस्यांना क्षती पोहचविण्याचा धाक दाखवुन त्यांना त्यांचे कर्तव्य पार पाडण्यापासुन धाकाने परावृत्त केले. तसेच समितीच्या सुरक्षेसाठी आलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांनासुद्धा मारहान केली. श्री. सुनिलकुमार मिश्रा यांनी चौकशी समितीसह केलेल्या गुन्हेगारी स्वरूपाच्या गैरवर्तणुकीमुळे त्यांच्याविरूद्ध विद्यापीठाद्वारे करण्यात आलेल्या तक्रारीनुसार त्यांच्या विरूद्ध गणेशपेठ पोलिस स्टेशन येथे भारतीय दंड संहितेच्या कलम ३५३, १८६, ३२३, ५०४ व ५०६ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणाची पोलिस यंत्रणेद्वारे चौकशी सुरू आहे. तसेच **ज्याअर्थी** सेंट्रल इंडिया इंस्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन येथील विद्यार्थ्यांनी २०१७–१८ सत्रात श्री. मिश्रा यांचेकडे परीक्षा शुल्क जमा केल्यावरही त्यांनी परीक्षा आवेदनपत्रे व परीक्षा शुल्क विद्यापीठात जमा केले नाही. त्यामुळे प्रवेशित विद्यार्थी परीक्षेपासुन वंचित राहिल्यामुळे संबंधीत विद्यार्थ्यांची फसवणूक झाली आहे, अशी गंभिर तक्रार विद्यार्थ्यांनी गणेशपेठ पोलिस स्टेशन येथे केलेली आहे. यासंबंधी पोलिस यंत्रणेद्वारे चौकशी सुरू करण्यात आली असुन संबंधीत पोलिस अधिकाऱ्यांनी दि. २१/०५/२०१८ रोजी प्रत्यक्ष विद्यापीठास पत्र देवुन विद्यापीठाकडून विविध मुद्यांची माहिती मागीतली आहे. सदर माहिती संकलीत करण्याचे कार्य विद्यापीठ कर्मचाऱ्याद्वारे सुरू आहे. **ज्याअर्थी** श्री. सुनिलकुमार मिश्रा यांनी गैरमार्गाने प्राप्त केलेल्या (Fraudulent) बोगस गुणपत्रिकेचा गैरवापर करून परिक्षा आवेदनपत्रे भरली व विद्यापीठाकडून नविन गुणपत्रिका प्राप्त करून विद्यापीठाची फसणवुक केली. तसेच या प्रकरणामध्ये इतरही बाबीसंबंधी विद्यापीठासह बनवेगीरी व फसवणुक केल्याबाबत त्यांच्या विरूद्ध सिताबर्डी पोलिस स्टेशन येथे FIR दाखल करण्याचा निर्णय विद्यापीठाद्वारे घेण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी सुध्दा पोलिस यंत्रणेद्वारे सुरू होईल, तसेच **ज्याअर्थी** श्री. मिश्रा यांनी उत्तीर्ण केलेली ट्रॅव्हल अ‍ॅण्ड टुरिझम या विषयाची पदविका परत घेण्याचा निर्णय परिक्षा मंडळाने घेतला होता. श्री. मिश्रा यांनी सदर पदविकेची गुणपत्रिका गैरमार्गाने प्राप्त केली काय? तसेच सदर गुणपत्रिका व पदविका वैध असल्यास ती श्री. मिश्रा द्वारे विद्यापीठास परत का करण्यात आली? यासंबंधी चौकशी समिती गठीत करून सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. तसेच श्री. मिश्रा यांनी

२०१७–१८ सत्रात विद्यार्थ्यांकडून प्रवेश व शैक्षणिक शुल्क प्राप्त केले परंतु एकही शिक्षक नियुक्त न करता वर्षभर शैक्षणिक वर्ग घेतले नाही व त्यामुळे विद्यार्थ्यांचें शैक्षणिक नुकसान केले. यास्तव २०१७–१८ सत्रात श्री. मिश्रा यांनी विद्यार्थ्यांकडून व शासनाकडून एकुण किती शुल्क वसूल केले? याबाबीचीसुद्धा चौकशी करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे.

वरील सर्व प्रकरणे अत्यंत गंभीर, दखलपात्र व संवेदनशील स्वरूपाची असून सदर प्रकरणाच्या चौकशी प्रक्रियेत श्री. मिश्रा यांचा कोणताही हस्तक्षेप होवू नये तसेच त्यांचा पूर्व इतिहास बघता त्यांनी त्यांच्या विरूध्दच्या चौकशीबाबतचे विद्यापीठात उपलब्ध असलेले कोणतेही पुरावे बाधीत करू नये तसेच विद्यापीठातील कोणत्याही अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संगणमत करून चौकशीबाबतचे पुरावे नष्ट करू नये तसेच श्री. मिश्रा यांच्या विरूध्द साक्ष देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कोणताही दबाव व आघात होऊ नये या सर्व बाबींची खबरदारी व उपाययोजना करणे आवश्यक असल्याने **वरील सर्व प्रकरणाची चौकशी पूर्ण होईपर्यंत श्री. सुनिलकुमार गयाप्रसाद मिश्रा, नागपूर यांना विद्यापीठ प्रशासनीक व शैक्षणिक परिसर क्षेत्रासाठी अवांच्छित व्यक्ती (Persona non grata) म्हणून जाहिर करण्याचा व त्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय परिसर आणि कार्यालयात प्रवेशबंदी करण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घेतला आहे.** श्री. मिश्रा यांना फक्त पत्र व्यवहाराद्वारे विद्यापीठाशी संपर्क करता येईल. तसेच वरील चौकशी प्रक्रियेत त्यांना चौकशीसाठी लेखी पत्राद्वारे बोलविण्यात आल्यास सक्षम अधिकाऱ्यांच्या परवानगीने त्यांना विद्यापीठ परिसरात प्रवेश देण्यात येईल, कृपया याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

मा. कुलगुरुंचे आदेशान्वये

(डॉ.पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव

**प्रतिलिपी माहितीकरीता अग्रेषित :**

१. श्री. सुनिलकुमार गयाप्रसाद मिश्रा, संस्थाध्यक्ष, सेंट्रल इंडिया इंस्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन, बैद्यनाथ चौक, नागपूर
२. विद्यापीठ शैक्षणिक विभागाचे सर्व विभाग प्रमुख.
३. विद्यापीठ संचालित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य व संचालक.
४. विद्यापीठातील सर्व अधिकारी व शाखाप्रमुख.
५. मा. पोलिस आयुक्त, नागपूर
६. पोलिस निरीक्षक, सिताबर्डी/अंबाझरी/गणेशपेठ, नागपूर.
७. स्थावर अधिकारी यांना निर्देशीत करण्यात येते की, सदर अधिसुचनेबाबत विद्यापीठाच्या विविध परिसरात तैनात असलेल्या सर्व सुरक्षा एंजन्सीला याबाबत माहिती द्यावी. व सदर अधिसुचनेचे काटेकोरपणे अनुपालन करण्याबाबत दक्षता घेण्याबाबत सुचित करावे. श्री. सुनिलकुमार मिश्रा यांनी विद्यापीठाच्या कोणत्याही परिसरात प्रवेश घेतल्याचे आढळल्यास सदर अधिसुचनेचे उल्लघंन केल्याबाबत तात्काळ जवळच्या पोलिस स्टेशन येथे तक्रार करावी. व त्याची माहिती मा. कुलसचिवांना कळवावी.
८. सर्व वृत्तपत्राचे संपादक व जनमाध्यमाचे प्रतिनीधी.

(वसीम अहमद)
उपकुलसचिव (सा.प्र.)
अति. प्रभार